# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# पुणे विभागीय मंडळ, पुणे - ४११००५

**<u>महत्वाचे</u>**

क्रमांक पुविमं/शाखा पी २/ ५०२
पुणे ४११ ००५.
दि. १४/०६/२०१६

प्रति,
प्राचार्य,
पुणे विभागीय मंडळ कक्षेतील
सर्व कनिष्ठ महाविद्यालये

**विषय** – जून-जु लै २०१६ मध्ये संपन्न होणा-या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र प्रात्यक्षिक परीक्षेच्या गुणपत्रिका व इतर साहित्य मंडळ कार्यालयात समक्ष जमा करणेबाबत. . . .

मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व कनिष्ठ महाविद्यालये प्रमुखांना कळविण्यात येते की, जून-जुलै २०१६ मध्ये उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेच्या शास्त्र, किमानकौशल्य व तांत्रिक विषयाच्या प्रात्यक्षिक परीक्षा दिनांक **२७/०६/२०१६ ते ०८/०७/२०१६**या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या आहेत. प्रात्यक्षिक/प्रकल्प/तोंडी परीक्षा संपन्न झाल्यानंतर परीक्षेचे परीक्षोत्तर साहित्य/गुणपत्रिका, आरोग्य व शारीरिक शिक्षण चे तक्ते इ. सर्व साहित्य खालीलप्रमाणे जिल्हयासमोर दर्शविलेल्या तारखेला समक्ष मंडळ कार्यालयात स्वीकारण्यात येईल.

| जिल्हा | वार व दिनांक |
|---|---|
| **अहमदनगर / सोलापूर** | **शनिवार ०९/०७/२०१६** |
| **पुणे** | **सोमवार ११/०७/२०१६** |

तरी सदर दिवशी सर्व प्रात्यक्षिक परीक्षेचे परीक्षोत्तर सर्व साहित्य एकाच वेळी आपल्या प्रतिनिधीमार्फत मंडळ कार्यालयात कार्यालयीन वेळेत आणून देण्याची व्यवस्था करावी.

**<u>कोणत्याही परिस्थितीत गुणपत्रिका व प्रायोगिक परीक्षेचे परीक्षोत्तर साहित्य पोस्टाने पाठवू नये.</u>**

तांत्रिक विषयातील प्रत्येक प्रात्यक्षिक विषयाला दोन पेपर्स म्हणजे पहिला **पेपर-१ व दुसरा पेपर-२** याप्रमाणे प्रात्यक्षिक विषयाच्या परीक्षा दोन भागात असल्याने त्यांचे गुणही दोन वेगवेगळया गुणपत्रिकेत नोंदवावेत.

वाणिज्य विषयांतर्गत येणा-या व्यावसायिक विषयांची (Biofocal) प्रात्यक्षिक, तोंडी परीक्षा व वर्षभराच्या कामकाजाचे टर्मवर्क, प्रकल्प अहवाल (प्रोजेक्ट रिपोर्टस) पडताळून परीक्षकांनी गुणदान करावयाचे आहे. तेव्हा प्रात्यक्षिक परीक्षेच्या वेळी संबंधित साहित्य विद्यार्थ्यांने सादर करणे आवश्यक असून परीक्षकाने साहित्य पाहूनच गुणदान करणे आवश्यक आहे. मात्र जर परीक्षेचेवेळी संबंधित साहित्य एखादया उमेदवाराने सादर केले नाही तर त्याला त्यासाठी निर्धारित केलेल्या रकान्यात '००' गुण दर्शविण्यात यावेत. परंतु कोणत्याही कारणास्तव गुणपत्रिकेतील रकाना कोरा (रिक्त) ठेवू नये.

आरोग्य व शारीरिक शिक्षण या विषयाची श्रेणीतक्ते भरताना श्रेणीचा सांकेतांक अंकात स्पष्ट देण्यात यावा. श्रेणीतक्ते भरण्यापूर्वी विद्यार्थी आरोग्य व शारीरिक शिक्षण विषयास हजर अगर गैरहजर आहे याची खात्री संबंधित शिक्षक व प्राचार्य यांनी आपल्या स्तरावर करावी. श्रेणी Alphabet मध्ये देऊ नये.

निकालानंतर विद्यार्थी पर्यावरण, आरोग्य व शारीरिक शिक्षण विषयास हजर होता व त्याचे प्रकल्प सादर करुन त्या विषयास श्रेणी दर्शविण्याबाबत कळविले जाते. यापुढे निकालानंतर या बाबी स्विकारण्यात येणार नाही.

**विद्यार्थी परीक्षेस उपस्थित आहे परंतु गुणपत्रकात अनुपस्थिती अशी बाब निदर्शनास आल्यास त्यासंदर्भात निकाल बदलाची कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही.**

गुणपत्रिकेत गुण नोंदविण्यापुर्वी उपरोक्त सूचना संबंधित विषयांचे अंतर्गत व बहि:स्थ परीक्षकांच्या निदर्शनास आणून देऊ न नेहमीप्रमाणे प्रात्यक्षिक परीक्षेची देयके उपरोक्त दिनांकास मंडळ कार्यालयात जमा करावीत. <u>प्रात्यक्षिक परीक्षेचे साहित्य स्विकारण्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत परीक्षेची देयके मंडळ कार्यालयात जमा करावीत</u>.

विभागीय सचिव
पुणे विभागीय मंडळ,
पुणे-४११ ००५